वर्ष- १०  अंक- ५०  मुंबई, मंगळवार, २९ ऑक्टोबर ते ०४ नोव्हेंबर २०२४  पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती  मराठी साप्ताहिक  मूल्य २/- रुपये
R.N.I. No. MAHMAR/2014/60133
POSTAL REGISTRATION No.PLG/205/2022-2024

# पोलीस बातमी पत्र
POLICE BATMI PATRA

पोलीस बातमी पत्र

• संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG 2 उन्हाळ्यात केसांना अधिक चमकदार ठेवतील या ‘५’ टीप्स

3 → भामटे आणि तोतये…

हरवलेली महिला आणि दोन्ही मुलांचा वाराणशी उत्तरप्रदेश मध्ये कसून शोध घेण्यास पोलिस ठरले यशस्वी ← 4

www.policebatmipatra.in  policebatmi  police batmi patra  policebatmipatra  policebatmipatra@gmail.com

## दिवाळीची शॉपिंग स्वस्तात मस्त? सावधान, एक चूक पडेल महागात, सायबर चोरट्यांकडून बनावट संकेतस्थळे, ॲपचा वापर

**मुंबई :** दिवाळीनिमित्ताने स्वस्त आणि मस्त वस्तू मिळत असल्याने अनेकांचा ऑनलाइन खरेदीकडे ओढा आहे. अनेक कंपन्यांनी ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी सवलती, सेल सुरू केले आहेत. सायबर चोरट्यांकडून याचाच गैरफायदा घेतला जात असून, बनावट संकेतस्थळे, अँपच्या माध्यमातून स्वस्तात वस्तू देण्याच्या बहाण्याने बँक खात्यावर डल्ला मारला जात आहे. सायबर पोलिस, तसेच अनेक संस्थांनी मार्गदर्शक सूचना जारी करीत याबाबत नागरिकांना सतर्क केले आहे.

चेंबूर येथील महिलेने भेट देण्यासाठी ५५० रुपयांची गणपतीची मूर्ती ऑनलाइन खरेदी केली. यासाठी तिने पैसेही भरले. मात्र, मूर्ती न आल्याने तिने कंपनीच्या ग्राहकसेवा क्रमांकावर संपर्क साधला. त्यानंतर वेगवेगळी कारणे सांगत त्यांची ५० हजार रुपयांची फसवणूक करण्यात आली. अशाचप्रकारे वसोर्वा परिसरात एका तरुणाने ऑनलाइन मागवलेला ६०० रुपयांचा शर्ट त्याला ८० हजारांना पडला.

हे फसवणुकीचे प्रकार कुणाच्याही सोबत होऊ शकतात. त्यातच दिवाळीनिमित्त अनेक कंपन्यांनी



ऑनलाइन सेल सुरू केले आहेत. ऑनलाइन खरेदी करताना एखादी चूक हातून घडली तर ती लाखोंना पडू शकते, असे पोलिसांनी म्हटले आहे. दरम्यान, ई-बात, आरबीआय कहता है या उपक्रमांतून याबाबत जनजागृती केली जात आहे. एनपीसीआय या कंपनीनेही काही सावधगिरीच्या सूचना जारी केल्या आहेत.

दहिसरमधील एका कुटुंबाने ॲपवरून घरी साफसफाई करण्यासाठी माणसे मागवली. या कामासाठी दोन तरुणांना पाठवण्यात आले. मात्र या हे दोघे साफसफाई करण्याबरोबरच घरातील चार लाखांचे दागिने चोरून पसार झाले. पोलिसांनी या प्रकरणात काही जणांना ताब्यात घेतले आहे

अजित पवारांना मोठा धक्का! सतीश शिंदे घेणार तुतारी हाती, सलील देशमुख यांना दिले समर्थन

**खरेदी करताना सावधान...**

- ऑनलाइन वस्तू मागवताना कॅश ऑन डिलिव्हरीच्या पयार्याला प्राधान्य द्यावे
- कॉलची खात्री पटेपर्यंत त्यांना गुगल पे अथवा अन्य ॲपवर पैसे पाठवू नयेत
- बँक खात्याचा तपशील व गोपनीय क्रमांक कधीही शेअर करू नये
- अनोळखी व्यक्तीने पाठवलेला क्यूआर कोड स्कॅन करू नका
- कोणालाही गुगल पे, फोन पे लिंक पाठवण्याची गरज नसते
- पेमेंट ॲपच्या लिंकवरील माहितीचा सायबर हॅकर्सना फायदा होतो

**विक्री करतानाही खबरदारी आवश्यक**

- ओएलएक्स किंवा क्यूकरवर स्वस्तामध्ये वस्तूच्या जाहिराती अपलोड केल्या जातात
- आपण विक्रीसाठी वस्तू ठेवल्यास खरेदीच्या बहाण्याने सायबर भामटे संपर्क करतात
- खोटे ओळखपत्र पाठवून नौदल किंवा सैन्यातील जवान असल्याचे भासवले जाते
- जितक्या रक्कम पाठवणार त्याची दुप्पट रक्कम देता येते, असा नियम असल्याचे भासवतात
- क्यूआर कोड, किंवा लिंक पाठवून त्याआधारे पैसे उकळले जातात




## मोबाईल आणि बुलेट मोटार सायकल चोरी करणाऱ्या अट्टल गुन्हेगारांना पोलिसांनी केली अटक



**विरार-** बुलेट मोटारसायकल तसेच मोबाईल चोरी करणा-या आरोपीस अटक - तुळींज पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण शाखेची उल्लेखनिय कामगिरी. अधिकमाहितीनुसार तुळींज पोलीस ठाणे येथे मोबाईल चोरीचा गुन्हा नोंद करण्यात आला होता. सदर गुन्हयाच्या तपासादरम्यान पो. शि/पोटे यांना बातमीदारामार्फत प्राप्त माहितीच्या अनुषंगाने सदर गुन्हयात आरोपी शिवम सुधीर झा, २७ वर्षे, रा. सहकार नगर, विरार, (पू) यास दि. २२/१०/२०२४ रोजी अटक करण्यात आली होती. सदर आरोपीकडे अधिक तपास केला असता तो बुलेटमोटारसायकल चोरी करण्यामध्ये सराईत असल्याचे पोलिसांना दिसुन आले. सदर आरोपी याने गेल्या १५ दिवसांमध्ये विरार परीसरामध्ये दोन मोटर सायकल व नालासोपारा पश्चिम येथे एक मोटर सायकल चोरी केली असल्याचे निष्पन्न झाले. सदर आरोपीस अटक करुन त्याच्याकडुन गुन्हयातील १ मोबाईल फोन व तीन मोटर सायकल हस्तगत करण्यात आल्या आहेत. वर नमुद अटक आरोपी याच्याकडुन तुळींज पोलीस ठाणे येथील १ गुन्हा, विरार येथील २ गुन्हे व नालासोपारा पोलीस ठाणे येथील १ गुन्हा असे एकुण ४ गुन्हे उघडकिस आणले असुन एकुण २ लाख ५० हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. सदरची कामगिरी मा. श्रीमती. पौणिमा चौगुले - श्रींगी, पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ - २ वसई, मा. श्री. उमेश माने-पाटील, सहा. पोलीस आयुक्त, वसई विभाग, श्री. शैलेंद्र नगरकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, तुळींज पोलीस ठाणे, श्री. सुधिर चव्हाण, पोलीस निरिक्षक (गुन्हे) यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि/सुनिल पवार, सहा. फौ / सुतनासे, पो. हवा/ वरठा, पो.हवा/मोरे, पो.हवा/ जाधव, पो. शि/ पोटे, पो. शि/ छपरीबन, पो. शि/ कदम, पो.शि/राजगे यांच्या पथकाने केलेली आहेच.

## आश्रय सामाजिक सांस्कृतिक शैक्षणिक ट्रस्टचा थाले सिमिया मुक्त भारत या विषयावरती गावोगावी जाऊन जनजागृती कार्यक्रम संपन्न





**नासिक,**

नासिक येथे जनकल्याण रक्तपेढी च्या सर्व डॉक्टर्स टेक्निशियन यांना आश्रय ट्रस्ट चे आरोग्य विभागाचे अध्यक्ष प्रोफेसर प्रकाश पांगम यांनी थलेसिमिया अनेमिया अशा विविध रक्ताच्या विकारामध्ये मनुष्याची कशी हानी होते यासाठी काय उपाययोजना केली पाहिजे कशा पद्धतीने रक्तामध्ये चाचणी करायची असते या संदर्भात मोठ्या प्रमाणामध्ये आज लेक्चर देण्यात आले ठीक ठिकाणी याचे लेक्चर देऊन मुलांच्या रक्ताच्या चाचण्या घेउन त्यावर इलाज करून थालेसिमिया मुक्त भारत करण्याचा संकल्प आश्रय ट्रस्ट चे संस्थापक डॉ दीपक मोरेश्वर नाईक यांच्या मार्गदर्शनाने राबवण्यात येणार आहे .

महाराष्ट्रातील काही कॉलेज शाळा शासनाच्या शाळा यांच्याकडे प्रत्येक विद्यार्थ्यांची तपासणी करून त्यांच्यातील रक्तातील कमी पूर्ण करण्यासाठी आश्रय ट्रस्टने पुढाकार घेतला आहे

तसेच नाशिक येथील जनकल्याण ब्लड बँक यांच्या वतीने सर्व ठिकाणी आम्ही शिबिर घेऊन आपणास सहकार्य करू असे आश्वासन दिले.

**Public Notice**

This is to inform the general public that the following flats, located at KunalKutir-B Co-operative Housing Society Ltd. (Regd No. TNA/(TNA)/HSG/TC 7905/95-96, dated 12/12/1995), Navghar Road, near Hanuman Mandir, Bhayandar (East), District Thane 401105, owned by 1) Balaji Construction (Mr. GurunathPatil) for Flat No. 103 and 2) Mrs. MeenaKishorPise for Flat No. 104, were purchased by our clients 1) Mr. Deepak MoreshwarNaik and 2) Mrs. Preeti Deepak Naik on 18/04/1991 and 31/03/1994, respectively.

The original registered sale deed documents related to these flats were lost on 25/09/2024 at around 2:00 PM while traveling by auto-rickshaw on Navghar Road, Bhayandar (East), District Thane.

Details of the properties are as follows:

**Annexure**

| Village | Survey No. | Part No. | Flat No. | Area (Sq. Ft.) | Name |
|---|---|---|---|---|---|
| Khari | 93 | 5 | 103 | 312 sq. ft. | Mr. Deepak MoreshwarNaik |
| Khari | 93 | 5 | 104 | 312 sq. ft. | Mrs. Preeti Deepak Naik |

The transaction for the above properties has been completed. If anyone has any claims, rights, or objections regarding these properties, such as agreements, sale deeds, mortgages, inheritance, gifts, donations, leases, liens, exchanges, easements, or any other rights or interests, they must submit their written objections along with supporting documents to the undersigned, acting as the advocate for the purchasers, within 14 (fourteen) days of the publication of this notice.

If no objections are received within the stipulated time, it will be assumed that there are no claims or objections regarding the said properties, and the transaction will be considered legally complete. Any objections raised after the specified period will not be binding on our clients. The public is requested to take note of this.

**Date: 25/09/2024**

Office Address:
Shop No. 14, Sonag Ganga Co-op Housing Society,
Near Golden Nest Bus Stop, Mira-Bhayandar Road,
Mira Road (East), District Thane 401107

**Signed:**
**Advocate SanjitTarakant Mishra**
(Purchaser Advocate)
Mobile: 9867032590 / 9320155624

## हरवलेली महिला आणि दोन्ही मुलांचा वाराणशी उत्तरप्रदेश मध्ये कसून शोध घेण्यास पोलिस ठरले यशस्वी

**काशिमिरा-**

मिसींग असलेली महीला व तिच्या दोन्ही मुलास वाराणसी, उत्तरप्रदेश येथे शोधण्यास मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेस यश. मिळालेल्या माहिती नुसार मिसींग महिला १) सुजाता मिथलेश चौधरी वय - ४० वर्षे व त्यांची दोन मुले २) अभिजीत मिथलेश चौधरी वय-२२ वर्षे ३) आदीत्य मिथलेश चौधरी वय - १९ वर्षे तिन्ही रा. रुम क्र. ०२, हनुमान मंदीरचे पाठीमागे, पेणकरपाडा, मिरारोड पुर्व असे तिघेही दिनांक ०५.०८.२०२४ रोजी ०८.०० वाजता राहते घरातुन कोणासही काहीही न सांगता निघुन गेल्याने मिसींग व्यक्तींचे पती व वडील मिथलेश जोगी चौधरी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन काशिमिरा पोलीस ठाणे मनुष्य मिसींग दिनांक ०५.०८.२०२४ रोजी दाखल आहे. मिसींग महीला व तिची दोन्ही मुले यांचा गेले अडीच महीने पोलीसांना कोणताही ठावठिकाणा मिळुन येत नव्हता. तक्रारदार यांना त्याच्या पत्नी व मुलांचा अडीच महीन्यात काहीही संपर्क न झाल्याने त्यांचे कोणीतरी काहीतरी बरेवाईट केले असावे अशी भिती वाटू लागल्याने तक्रारदार यांनी गुन्हे शाखेशी संपर्क साधला. विषयाचे गांभीर्य लक्षात घेवून वरिष्ठांनी सुचना दिल्याप्रमाणे मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे प्रभारी राहुल राख यांनी पोउपनिरी. हितेंद्र विचारे, पोहवा. हनुमंत सुर्यवंशी असे तपास पथक तयार केले. नमुद पोलीस पथकाने सदर मन्युष्य मिसींगची काशिमीरा पोलीस ठाणेतुन माहीती घेऊन त्यानुसार तांत्रिक व गोपनिय तपास करून मेहनत घेवुन तपासात सातत्य ठेवून वरील तिन्ही मिसींग व्यक्ती या वाराणसी, उत्तरप्रदेश येथे असल्याची माहीती गुप्त बातमीदाराकडुन तसेच तांत्रीक विष्लेषनवरुन मिळाली असता सदर ठिकाणी वरीष्ठांचे परवानगीने पोहवा / हनुमंत सुरेश सुर्यवंशी यांना रवाना करण्यात आलेले होते. पोहवा / हनुमंत सुर्यवंशी यांनी वरील तिन्ही मिसींग इसमाचा रामनगर पोलीस ठाणे, जिल्हा वाराणसी, उत्तरप्रदेश येथील पोलीसांचे मदतीने शोध घेतला असता वरील तिन्ही मिसींग इसम हे भिटी सुलतानपुर, रामनगर, वाराणसी, उत्तरप्रदेश येथे मिळुन आले आहेत. सदरची कारवाई ही मा. पोलीस उप आयुक्त (गुन्हे) श्री. अविनाश अंबुरे व सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. मदन बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे प्रभारी पोलीस निरीक्षक राहुल राख, पोनि धनंजय पोरे, सपोनि दत्तात्रय सरक, नितीन बेन्द्रे, पोउपनि हितेंन्द्र विचारे, सहापोउपनि श्रीमंत जेधे, मनोहर तावरे, आसीफ मुल्ला, पोहवा / हनुमंत सुर्यवंशी, संग्राम गायकवाड, शिवाजी पाटील, गोविंद केद्रे, राजाराम काळे, संतोष मदने, सतिष जगताप, राजविर संधु, प्रविणराज पवार, महेश वेल्हे, अनिल नागरे, पोशि.साकेत माघाडे अखिल सुतार, नितीन राठोड, अंगद मुळे, मसुब सचीन चौधरी, सफौ. संतोष चव्हाण सर्व नेमणुक मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखा यांनी यशस्वी कामगिरी केलेली आहे.

## केवळ स्वाद नव्हे तर गुणांनीही परिपूर्ण उसाचा रस



**उन्हाळ्याची** काहिली आता चांगलीच जाणवू लागली आहे आणि त्यामुळे साहजिकच लोकांची पावले आईस्क्रीम पार्लर, थंड पेये विकणाऱ्या दुकानांकडे वळू लागली आहेत. त्यातच उसाच्या गुऱ्हाळांनी म्हणजे रसवंतीगृहांनी त्यांचे संसार सुरू केले असून थंडगार, स्वादिष्ट आणि आले-लिंबू घालून केलेला गारेगार रस पिण्यासाठी गर्दी होऊ लागली आहे.

उसापासून मिळणारा हा नैसर्गिक रस केवळ स्वादिष्टच नाही तर आरोग्यासाठी खूपच फायदेशीर आहे. अँटीऑक्सिडंटनी समृद्ध असा हा रस रोगप्रतिकारक शक्ती वाढविणारा आहे. आयर्न, मॅग्नेशियम, कॅल्शियम व अन्य इलेक्ट्रोलाईट्सचे प्रमाण या रसात पुरेसे असते, त्यामुळे डीहायड्रेशन झालेल्यांना रस पिणे फार उपयुक्त ठरते. सर्वसामान्य सर्दी आणि अन्य किरकोळ साथीचे आजार रोखण्यास रस पिणे फायद्याचे आहे तसेच ताप उतरवण्यासाठी सुद्धा रस पिण्याचा उपयोग होतो कारण उसाचा रस शरीरात प्रोटीनची पातळी वाढवितो.

उसाच्या रसात कर्बोदके, प्रथिने, शिवाय आयर्न, पोटॅशियम अधिक मात्रेत असते यामुळे एक ग्लास उसाचा रस शरीरातील ऊर्जेची पातळी वाढवितो आणि शरीराचा थकवा दूर करतो. रक्तातील प्लाझ्मा आणि अन्य तरल पदार्थ वाढवितो. मूत्रपिंडाच्या विकारात म्हणजे किडनी स्टोनमध्ये रस पिणे फायद्याचे आहे. तसेच हा रस दात किडणे आणि श्वास दुर्गंधी रोखणारा आहे. यकृत म्हणजे लिव्हरला बळ देणारा असल्याने कावीळ झाल्यास उसाचा रस द्यावा, असे सांगितले जाते. आयुर्वेदानुसार उसाच्या रसाचे सेवन बद्धकोष्ठता दूर करणारे आहे आणि रसात असलेल्या क्षारांमुळे पित्त, पोटातील जळजळ दूर होते. उसाच्या रसात ए तसेच सर्व प्रकारची बी व्हिटॅमिन्स असतात, म्हणूनही उसाचा रस आरोग्यवर्धक ठरतो. फक्त रसवंतीगृहात रस पिताना उघड्यावरच बर्फ घालणे टाळावे तसेच रसवंतीगृहाची तेथील ग्लास, रस पिळणारे चरक यांची स्वच्छता आहे याची खात्री करून घ्यावी.

## उकडवून स्वादिष्ट कॉर्न बॉल्स बनवा

**स्वीट कॉर्नपासून अनेक प्रकारचे पदार्थ बनवता येतात. लोकांना भुट्टा देखील आवडतो आणि तो आरोग्यासाठी देखील फायदेशीर ठरू शकतो. स्वीट कॉर्न चवीला काहीसा गोड असतो. ते उकडवून खाऊ शकता किंवा काही स्नॅक्स देखील बनवू शकता. थाई स्वीट कॉर्न रेसिपी देखील बनवू शकता. ही रेसिपी करायला खूप सोपी आहे. चला तर मग साहित्य आणि कृती जाणून घेऊ या.**

**साहित्य :** कणीस, लेमन ग्रास (लेमन ग्रासचे भारतीय नाव), लिंबाचा रस, बेकिंग पावडर, काळी मिरी, करी पेस्ट, नारळ पावडर, कॉर्न फ्लोअर आणि मीठ.

**पाककृती :** वाफवलेले कॉर्न बॉल्स बनवण्यासाठी कॉर्न पाच मिनिटे उकडवा. आता कॉर्नमधील पाणी पिळून घ्या. नंतर उकडलेले कॉर्न ग्राइंडरमध्ये बारीक करून पेस्ट तयार करा. या कॉर्न पेस्टमध्ये नारळाची दूध पावडर, चिरलेला लेमनग्रास, लिंबाचा रस, हिरवी करी पेस्ट, कॉर्नफ्लोअर, बेकिंग पावडर, काळी मिरी पावडर आणि मीठ घाला.

सर्व साहित्य चांगले मिसळा आणि या मिश्रणाचे छोटे गोळे बनवा. कॉर्न बॉल्स स्टीमरमध्ये १०-१२ मिनिटे शिजवा. स्टीम कॉर्न बॉल्स तयार आहेत. चटणीसोबत सर्व्ह करा.



## Public Notice

This is to inform the general public that the below-mentioned agricultural land, located at MoujeKukade, Gram Panchayat Mahagaon, Taluka and Panchayat Samiti, ZillaParishadPalghar, District Palghar, owned by 1) Mr. Bharat MahadevDaruwale and 2) Mr. KiranHareshwarDaruwale, was purchased by our clients, 1) Mr. Deepak MoreshwarNaik and 2) Mrs. Preeti Deepak Naik, on 24/09/2007.

The original registered sale agreement documents related to the said land were lost during travel on 25/09/2024 at around 2:00 PM while commuting by auto-rickshaw on Navghar Road, Bhayandar (East), District Thane.

Details of the property are as follows:

**Annexure**

| Village | Survey No. | Part No. | Area (Hectares-Ares) | Value (Rs.) |
|---|---|---|---|---|
| Kukade | 33 | Part 3 | 0-89-0 | 0-62 |
| | | Subdivision – Inferior Class (A) | 0-12-0 | |
| | | Part 4 | 0-90-0 | 0-66 |
| | | Subdivision – Inferior Class (A) | 0-12-0 | |
| | | Subdivision – Inferior Class (A) | | |

The transaction for the sale of the above property has been completed. If anyone has any claims, rights, or objections related to the sale, such as agreements, mortgage, lien, possession, inheritance, donation, gift, lease, exchange, easement, or any other type of ownership, they are required to submit their written objections along with supporting documents to the undersigned, acting as the advocate for the purchaser, at the address mentioned below within 14 (fourteen) days from the publication of this notice.

If no objections are received within the stipulated time, it will be presumed that there are no claims or objections of any kind regarding the said property, and the transaction will be considered complete. Any objections raised after the said period will not be binding on our clients. The public is requested to take note of this.

**Date: 25/09/2024**
Office Address:
Shop No. 14, Sonag Ganga Co-op Housing Society,
Near Golden Nest Bus Stop, Mira-Bhayandar Road,
Mira Road (East), District Thane 401107

**Signed:**
**Advocate SanjitTarakant Mishra**
(Purchaser Advocate)
Mobile: 9867032590 / 9320155624

## पासवर्ड आठवतच नाहीये? काळजी नको, पासवर्डशिवाय अनलॉक करा मोबाईल, पाहा ट्रिक्स

**सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रत्येकजण स्मार्टफोनला लॉक ठेवतो. फोनमध्ये अनेक वैयक्तिक आणि महत्त्वाच्या गोष्टी सेव्ह असतात. या गोष्टी कोणी पाहू नयेत, अशी युजर्सची इच्छा असते. यामुळेच मोबाईल लॉक करणे ही पर्यायपेक्षा गरज बनली आहे. पण जर तुम्ही तुमचा पासकोड विसरलात तर? तुमचा सर्व डेटा देखील करप्ट होऊ शकतो. विसरलेला पासकोड परत मिळवणे अनेकांसाठी कठीण असते. ही समस्या तुम्ही आधीच सोडवली तर बरे. आज आम्ही तुम्हाला अशा पद्धतीबद्दल सांगत आहोत, ज्याद्वारे तुम्ही पासवर्ड न टाकता तुमचा फोन अनलॉक करू शकता. परंतु, पिन किंवा पासवर्ड सेट करण्यापूर्वी तुम्हाला ही पद्धत करावी लागेल.**




**स्मार्ट लॉकसह अनलॉक करा :** हे एक अँड्रॉईड फीचर आहे, जे तुम्हाला काही विशिष्ट परिस्थितींमध्ये लॉक स्क्रीन सुरक्षिततेला बायपास करण्याची परवानगी देते. यासाठी तुम्हाला सेटिंगमध्ये जाऊन सिक्युरिटीमध्ये जावे लागेल. यानंतर तुम्हाला स्मार्ट लॉकमध्ये जावे लागेल. तो तुमचा फोन लॉक लक्षात ठेवेल. पिन सेट करण्यापूर्वी हे करणे आवश्यक असेल.

**ऑन-बॉडी डिटेक्शन :** येथे तुम्हाला ऑन-बॉडी डिटेक्शनसह पासवर्डशिवाय तुमचे विद्यमान लॉक अनलॉक करण्यासाठी ५ पर्याय दिले जातील. यामध्ये तुम्ही फोन हातात घेतला आहे की नाही हे फोनला कळेल. फोन तुमच्या हातात किंवा खिशात असल्यास फोन आपोआप अनलॉक होईल.

**विश्वसनीय ठिकाणे :** तुमचा फोन आपोआप अनलॉक होईल असे स्थान तुम्ही निवडू शकता.

**विश्वसनीय उपकरणे :** विश्वासार्ह फिटनेस ट्रॅकर किंवा कारसारख्या अन्य ब्लूटूथ उपकरणाशी कनेक्ट केल्यावर तुमचा फोन आपोआप अनलॉक होईल.

**विश्वासार्ह चेहरा :** फोन अनलॉक करण्यासाठी फेशियल रेकग्निशन वापरा.

**व्हॉइस मॅच :** तुमचा फोन तुमचा आवाज ओळखताच, तो तुमचा फोन अनलॉक करेल. हे वैशिष्ट्य अँड्राइड ८ ओरियो नंतर बंद करण्यात आले होते परंतु ते अद्याप जुन्या उपकरणांवर काम करते.

## बिटाच्या अतिसेवनाने होऊ शकतात दुष्परिणाम

**बीट** ही भाजी शरीराच्या आरोग्याच्या दृष्टीने अतिशय चांगली समजली जाते. पण आरोग्याच्या दृष्टीने एखादा पदार्थ कितीही चांगला असला, तरी त्याच्या अतिसेवनाने दुष्परिणाम उद्‌भवू शकतात. बिटाच्या अतिसेवनाने देखील शरीरावर काही दुष्परिणाम दिसून येण्याची शक्यता असते. हे दुष्परिणाम कोणते आहेत, ते जाणून घेऊ या. बिटाच्या अतिसेवनाने 'गाऊट' किंवा किडनी स्टोन्स सारख्या समस्या उद्‌भवण्याची शक्यता असते. तसेच बिटाच्या रसाच्या अतिसेवनाने शरीरामध्ये लोह, कॉपर, मॅग्नेशियम, लिव्हरमध्ये साठत राहून त्यामुळेही समस्या उद्‌भवू शकतात.



बिटाच्या अतिसेवनामुळे 'बीट-युरिया' दिसून येण्याची शक्यता असते. लघवीचा सामान्य रंग बदलून तो बिटाप्रमाणे लालसर होणे हे बीट-युरियाचे लक्षण आहे. तसेच ज्या व्यक्तीच्या शरीरामध्ये लोहाची कमतरता असेल, त्यांच्या बाबतीत ही समस्या अधिक उद्‌भवते. ही समस्या फारशी गंभीर नसली, तरी यासाठी डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे. बिटामध्ये 'ऑक्सलेट' मुबलक मात्रेमध्ये असून यांच्या अतिसेवनाने किडनी स्टोन्स होण्याची शक्यता असते. म्हणून ज्या व्यक्तींमध्ये आधीपासूनच किडनी स्टोन्सची समस्या असते, त्यांना बीट आहारातून कमी करण्याचा सल्ला दिला जातो. तसेच ज्यांना 'गाऊट' हा विकार असेल, त्यांनाही बीट आहारातून वर्ज्य करण्याचा सल्ला दिला जातो.

बिटाच्या अतिसेवनाचे आणखी एक लक्षण म्हणजे शरीरावर येणारे बारीक पुरळ. हे लक्षण सामान्य नसून, अतिशय अभावानेच आढळते. बिटाच्या अतिसेवनाने अंगावर बारीक पुरळ उठणे, शरीरावर लालसर चट्टे उठणे, खाज सुटणे, आणि क्वचित थंडी वाजून ताप येणे अशी लक्षणेही पाहिली गेली आहेत. त्याचप्रमाणे बिटाचे सेवन केल्यानंतर आवाज बसण्याची समस्या दुर्मिळ असली, तरी पाहिली गेली आहे. बिटाच्या अतिसेवनाने पोटामध्ये गॅसेस होऊन पोटदुखी उद्‌भवू शकते. तसेच पोट फुगणे, बद्धकोष्ठ याही समस्या बिटाच्या अतिसेवनाने उद्‌भवू शकतात.

## उन्हाळ्यात केसांना अधिक चमकदार ठेवतील या '५' टीप्स



**उन्हाळ्याच्या दिवसांत घामामुळे डोक्याला खाज येणं, केसात कोंडा वाढणं हा त्रास हमखास आढळतो. उन्हाळ्यात त्वचेची, आरोग्याची काळजी घेतली जाते. पण केसांकडे फारसे लक्ष दिले जात नाही. परिणामी अनेक छुपे त्रास किंवा त्वचा विकार वाढण्याची शक्यता असते. म्हणूनच शुष्क आणि फ्रिझी केसांची नेमकी काळजी कशी घ्यावी दिलेला हा सल्ला नक्की जाणून घ्या.**

**उन्हाळ्याच्या** दिवसात वातावरणातील उष्णता आणि आर्द्रता यामध्ये बदल होत असल्याने केस अधिक शुष्क होतात. उन्हाळ्याच्या दिवसात घाम येण्याचं प्रमाण अधिक वाढतं. त्यामुळे टाळूजवळील त्वचा अधिक चिकट होते. त्याचा परिणाम केसांवरही जाणवतो.

▮उन्हाळ्याच्या दिवसात किमान २-३ वेळा केस स्वच्छ धुवावेत. नियमित केस धुणे शक्य नसेल तर एक आड एक दिवस केस स्वच्छ धुवावेत. यामुळे केस चिकट होणार नाहीत.

▮केस धुण्यासाठी माईल्ड किंवा हर्बल शाम्पू वापरा. केमिकलयुक्त शाम्पूमुळे केसांचे अधिक नुकसान होते. तुम्हांला डॅण्डरफचा त्रास असेल तर ॲण्टी डॅण्डरफ शाम्पू वापरा.



▮शाम्पूने केस धुतल्यानंतर चांगल्या दर्जाचे कंडिशनरही वापरा. टाळूवर कंडिशनर लावू नका. शक्य असेल तर लिव इन कंडिशनर वापरा. यामुळे सूर्याच्या प्रखर किरणांप्रमाणेच प्रदूषणामुळे केसांचे होणारे नुकसान टाळण्यासही मदत होते.

▮उन्हाळ्याच्या दिवसात केसांची चमक आणि पोत सुधारण्यासाठी ॲप्पल सायडर व्हिनेगर फायदेशीर ठरते. या घरगुती उपायासाठी दोन टीस्पून ॲप्पल सायडर व्हिनेगर एक लिटर पाण्यामध्ये मिसळा. केस शाम्पूने धुतल्यानंतर केस या पाण्यानेही स्वच्छ धुवा.

▮तुमचे केस मोकळे सोडणार असाल तर सनस्क्रीनयुक्त हेअर कंडिशनर आणि सेरम वापरा. यामुळे घामाने केस चिकचिकीत होण्याची शक्यता कमी होते. यामुळे केस रफ आणि विस्कटलेले दिसण्याची शक्यता कमी होते.

## बद्धकोष्ठ दूर करण्याकरिता प्या मूग आणि पालकाचे सूप



**आपल्या** भोजनाच्या सवयी, आपला आहार आणि आपल्या शरीराला दिवसभरामध्ये होत असणारा व्यायाम, हालचाल, या गोष्टींवर आपण खात असलेल्या अन्नाचे पचन मोठ्या प्रमाणात अवलंबून असते. जर पचनक्रिया सुरळीत नसेल, तर अपचन, बद्धकोष्ठासारख्या समस्या उद्‌भवतात. जर तुम्हालाही या समस्यांना वारंवार तोंड द्यावे लागत असेल, तर आहारामध्ये थोडा फार बदल करण्याची आवश्यकता आहे असे समजण्यास हरकत नाही. जर बद्धकोष्ठाचा त्रास होत असेल, तर आपल्या आहारामध्ये मुख्यत्वे फायबरची मात्रा जास्त असलेल्या पदार्थांचे सेवन करणे आवश्यक आहे. याच अंतर्गत आणि सध्याच्या थंडीच्या मोसमामध्ये सर्वांना नक्कीच आवडेल अश्या मूग आणि पालक सूपचा समावेश आहारामध्ये करता येईल. हे सूप पचण्यास कठीण नसून, यामध्ये शरीरासाठी आवश्यक सर्व पोषक तत्वे आहेतच, त्याच्याच जोडीने पचनासाठी आवश्यक फायबरही या सूपद्वारे शरीराला मिळू शकते. हे सूप बनवण्यासाठी एक कप हिरवे मूग पाण्यामध्ये रात्रभर भिजत घालून ठेवावेत. दुसऱ्या दिवशी सकाळी मूग पाण्यातून उपसून स्वच्छ धुवून घ्यावेत आणि प्रेशर कुकरमध्ये मऊ शिजवून घ्यावेत. एका भांड्यामध्ये थोडेसे तेल किंव साजूक तूप घालून त्यामध्ये एक चिरलेला कांदा, पालकाची पाने (दीड कप), थोडे आले, लसूणाच्या पाच सहा पाकळ्या, हळद आणि पाव चमचा कुटून घेतलेले धणे घालवेत. त्यानंतर यामध्ये आवडत असल्यास गाजराचे तुकडे, फ्लॉवरचे तुकडे, आणि थोडासा पुदिना घालून चांगले परतावे. भाज्या चांगल्या शिजल्या की शिजवून घेतलेले मूग यामध्ये घालून चांगले परतावेत. त्यानंतर गॅस बंद करून हे मिश्रण थंड होऊ द्यावे. मिश्रण थंड झाल्यानंतर थोडेसे पाणी घालून हे मिश्रण मिक्सरवर बारीक वाटून घ्यावे व चाळणीतून किंवा मोठ्या गाळणीतून गाळून घेऊन भाज्यांचा चोथा वेगळा करावा. गाळून घेतलेल्या मिश्रणामध्ये आवश्यक तेवढे पाणी घालून चवीपुरते मीठ आणि काळ्या मिऱ्याची पूड घालावी. सूपला चांगली उकळी आल्यानंतर गॅस बंद करावा.



## व्यायामासाठी वापरण्यात येणाऱ्या कपड्यांमधून घामाची दुर्गंधी अशी करा दूर

**व्यायाम करीत असताना पुष्कळ घाम येत असतो. अंगावरील कपड्यांमध्ये हा घाम शोषून घेतला जात असतो. अंगावरील कपडे घामाने ओले झाले असता, त्यामध्ये व्यायाम सुरू ठेवणे अडचणीचे होऊ लागते. ही अडचण दूर करीत व्यायाम करताना घाम शोषून घेण्यासाठी आणि चटकन वाळण्यासाठी आजकाल 'ड्राय फिट' पद्धतीचे कपडे खास व्यायामप्रेमी मंडळींसाठी तयार करण्यात येत असतात. व्यायाम करताना वापरण्यात येणाऱ्या कपड्यांमुळे शरीरावरील घाम जरी शोषून घेतला जात असला, तरी अनेकदा या कपड्यांमधील घामाची दुर्गंधी मात्र कपडे धुतल्यानंतरही हटत नाही. ही दुर्गंधी दूर करण्यासाठी काही उपायांचा अवलंब करता येऊ शकेल.**

**आजकाल** व्यायामासाठी खास बनवण्यात येणाऱ्या कपड्यांमध्ये अतिशय सूक्ष्म छिद्रे असतात. पण शरीरावरील घाम, बाहेरील वातावरणातील प्रदूषण, किंवा धुळीचे कण, त्वचेचा तेलकटपणा, कपडे धुण्यासाठी वापरण्यात येणारे डिटर्जंट इत्यादी कपड्यातून व्यवस्थित साफ न झाल्याने याचे कण या सूक्ष्म छिद्रांमध्ये अडकून राहतात आणि त्यामुळे कपडा धुतल्यानंतर त्यातून विशिष्ट दुर्गंधी येत राहते. ही दुर्गंधी हटवण्यासाठी सर्वप्रथम व्यायाम करून झाल्यानंतर जर कपडे घामाने थोडेच ओले झाले असतील, तर हे कपडे आधी हवेवर चांगले वाळू द्यावेत. कपडे धुण्यासाठी अधिक साबण वापरला तर कपडे अधिक स्वच्छ होतात हा गैरसमज आहे. वास्तविक प्रत्येक पद्धतीचा कपडा ठरावीक साबणाच्या मात्रेने स्वच्छ होणारा असतो. तसेच कपडे धुण्यासाठी वॉशिंग मशीनमध्ये देखील ठरावीक प्रमाणातच साबण वापरला जाणे आवश्यक असते. त्यामुळे यापेक्षा अधिक साबण वापरला गेल्यास कपडे खळबळून धुवूनही हा साबण त्यातून पूर्णपणे निघत नाही. कपड्यातील साबण पूर्णपणे काढून न टाकताच कपडा वाळवला गेला तर यामुळेही कपड्यामध्ये दुर्गंधी येऊ लागते. त्यामुळे साबणाचा आवश्यक तितकाच वापर केला जाणे आवश्यक आहे. व्यायामाचे कपडे धुण्यासाठी 'फॅब्रिक सॉफनर'चा वापर करू नये. कपडे साबणाने धुतल्यानंतर ते न आकसता मुलायम आणि सुगंधी राहावेत याकरिता फॅब्रिक सॉफनरचा वापर करण्यात येतो. पण याचा वापर व्यायामासाठी वापरण्यात येणाऱ्या कपड्यांसाठी केला असता, यामुळे कपड्यावरील सूक्ष्म छिद्रे बुजण्याची शक्यता असते. जर ही छिद्रे बुजली, तर कपडा स्वच्छ होत नाही आणि त्यातून दुर्गंधी येऊ लागते. त्याचप्रमाणे सॉफनरच्या वापराने कपड्याचा आकार आणि फिट बिघडण्याची देखील शक्यता असते. जर व्यायामाचे कपडे घामाने भिजून खूपच ओले झाले असतील तर मात्र हे कपडे हवेवर वाळू न देता त्वरित धुणे योग्य ठरते. कपडे धुण्यापूर्वी ते उलटे करावेत, यामुळे तुमच्या त्वचेच्या संपर्कात आलेला कपड्याचा भाग व्यवस्थित धुतला जातो. व्यायामाचे कपडे शक्यतो इतर कपड्यांच्या जोडीने धुणे टाळावे. तसेच हे कपडे धुताना पाण्यामध्ये थोडे व्हिनेगर घालून कपडे धुवावेत. व्हिनेगरमुळे कपड्यांमधील दुर्गंधी पूर्णपणे दूर होते. व्हिनेरगरचा वापर करायचा असल्यास आधी एका बादलीमध्ये चार भाग पाणी आणि एक भाग व्हिनेगरमध्ये कपडे भिजवून ठेवावेत आणि मग नेहमीप्रमाणे धुवावेत. कपडे धुतल्यानंतर हवेशीर ठिकाणी वाळवावेत. त्यामुळे कपड्यामधील दुर्गंधी नाहीशी होईल.



पोलीस बातमी पत्र
महामुंबई
३
मुंबई, मंगळवार, २९ ऑक्टोबर ते ०४ नोव्हेंबर २०२४

# संपादकीय

# भामटे आणि तोतये...



संपादक दिपक मोरेश्वर नाईक

नियम व कायदे मोडायचेच असतात असे मानणारा मोठा वर्ग समाजात तयार झाला आहे, यातले गांभीर्य कुणाच्या लक्षात येत नाही हीच आजची शोकांतिका आहे. इतक्या उघडपणे सुरू असलेली भामटेगिरी एकाच्याही लक्षात येत नाही यावर विश्वास तरी कसा ठेवायचा? नियम व कायदे मोडायचेच असतात असे मानणारा मोठा वर्ग समाजात तयार झाला आहे, यातले गांभीर्य कुणाच्या लक्षात येत नाही हीच आजची शोकांतिका आहे. महाठग अथवा तोतयांचे उगवणे हा काही समाजाला लागलेला नवा रोग नाही. इतिहासात डोकावले तर अशी अनेक उदाहरणे आढळतात. पानिपतच्या लढाईत सदाशिवराव पेशवे मारले गेले पण त्यांचा तोतया नंतर राज्यात अवतरला ही गोष्ट सर्वश्रुत आहे. अगदी काही दशकांपूर्वी नाटकाच्या माध्यमातून लोकप्रिय ठरलेल्या लखोबा लोखंडेचे नाव अजूनही अनेकांच्या ओठावर रुळलेले. समाज प्रगत झाला. अलीकडच्या काळात तो अधिक तंत्रस्नेही झाला असे आपण कितीही उच्चरवाने सांगत असलो तरी या असल्या ठगांचे प्रकट होणे व त्यांच्याकडून फसवणुकीचे प्रकार काही थांबलेले नाहीत. उलट त्यात वाढच होताना दिसते. या बनवेगिरीला नेमके प्रोत्साहन कशामुळे मिळते? व्यवस्थेतल्या दोषामुळे की समाजात अजूनही भोळसटांची संख्या जास्त असल्यामुळे, यावर विचार करण्याआधी सध्या चर्चेत असलेली तोतयागिरीची काही उदाहरणे नजरेखालून घालणे गरजेचे. गुजरातमधील अहमदाबादला कुणा मॉरीस सॅम्युअल नावाच्या इसमाने चक्क बनावट न्यायालयच उभे केले व गेली पाच वर्षे तो त्या माध्यमातून खटले चालवून निवाडे देत राहिला. आधी खऱ्या न्यायालयात अशिलांच्या वतीने दलाली करणाऱ्या या सॅम्युअलची हिंमत इतकी कशी वाढली हा यातला खरा प्रश्न. दिवाणी खटले निकाली काढण्यासाठी मध्यस्थ (आर्बिट्रेटर) नेमण्याची तरतूद कायद्यात आहे. न्यायालये यासाठी निवृत्त न्यायाधीशांची मदत घेतात. नेमकी हीच तरतूद ध्यानात घेत या व्यक्तीने चक्क न्यायालय थाटले, त्यात युक्तिवादासाठी बनावट वकील उभे केले, कर्मचारी नेमले व जमीनविषयक निवाडे देत गेला. यातून त्याने एका अशिलाची शंभर एकर जमीनही लाटली. यासंबंधीच्या आदेशाची अंमलबजावणी करण्याचे निर्देश प्रशासनाला द्यावे म्हणून तो खऱ्या न्यायालयात गेला तेव्हा हे प्रकरण उघडकीस आले. त्याच्या न्यायालयात दाद मागणाऱ्या एकालाही या बनवेगिरीवर संशय कसा आला नाही हा यातला कळीचा प्रश्न. खऱ्या न्यायालयात लवकर न्याय मिळत नाही. मिळाला तरी तो आपल्या बाजूचा असेल याची खात्री देता येत नाही. त्यापेक्षा झटपट निकाल देणारे हे न्यायालय बरे असा विचार लोक करायला लागले का? पूर्वी व आताही समाजातील अनेकजण जागल्या म्हणून काम करत असतात. व्यवस्थेतील दोष, प्रशासनाने केलेल्या चुका, गैरव्यवहार लक्षात आणून देणे त्यांचे काम. यापैकी एकाही जागल्याच्या लक्षात ही फसवणूक आली नसेल का? असे घडू नये यासाठी कार्यरत असलेल्या यंत्रणा नेमके काय करत होत्या? याच गुजरातमधील किरण पटेल नावाचा भामटा सलग सहा वर्षे पंतप्रधान कार्यालयातील अतिरिक्त संचालक म्हणून देशभर फिरला. त्यातला बराच काळ तो दहशतवादाने धगधगत असलेल्या जम्मू-काश्मीरमध्ये वावरला. सैन्यदलाच्या अतिथिगृहात मुक्काम ठोकणे, प्रचंड सुरक्षाव्यवस्था घेऊन फिरणे, विकासकामांची पाहणी करणे, अधिकाऱ्यांच्या बैठका घेणे, सत्ताधारी भाजपच्या स्थानिक नेत्यांना बोधामृत पाजणे अशी अनेक दिव्य कामे त्याने या काळात केली. सोबतीला अनेकांची आर्थिक फसवणूक करणे सुरूच होते. या काळात त्याची सरबराई करणाऱ्या एकाही उच्चपदस्थाला हा खरा की खोटा याची पडताळणी करावी असे वाटले नसेल का? या काळात पंतप्रधान कार्यालयातून अनेक खरे अधिकारी काश्मीरला आले असतील. किमान त्यांच्याकडे चौकशी करावी असेही कुणाला सुचले नसेल का? याची उत्तरे आपल्यात अजूनही कायम असलेल्या गुलामगिरीच्या मानसिकतेत दडलेली. उच्चस्तरावरून येणारा वरिष्ठ म्हणजे जणू देव याच पद्धतीने खालचे वर्तुळ काम करत असते. प्रशासकीय व्यवस्थेतच अशी भावना असेल तर समाजातील स्थिती आणखी किती वाईट असेल याची यावरून कल्पना येते. मध्यंतरी गुजरातेत एक बनावट टोलनाका उघडकीस आला. म्हणजे बंद झालेल्या नाक्याचा ताबा एका टोळीने घेतला व ते रीतसर पावत्या छापून दोन वर्षे टोल गोळा करत राहिले. या काळात या नाक्यावरून हजारो वाहने गेली असतील. त्यातील एकाही प्रवाशाला हा नाका बंद झालेला आहे याची माहिती नसेल का? व्यवस्थेवर इतका आंधळा विश्वास? तो धोकादायक ठरू शकतो असेही कुणाला वाटत नसेल तर हे लोकशाहीचे अपयश आहे असे आता समजायचे काय? मुळात प्रगतीच्या नादात आपण व्यवस्थेला, राज्यकर्त्यांना प्रश्न विचारण्याची सवयच हळूहळू हरवून बसलो आहोत. हे दुबळेपणाचेच लक्षण. त्यात वाढ होत गेली तर अशा तोतयेगिरीला ऊत येईल हा धोकाही कुणी लक्षात घ्यायला तयार नाही. व्यवस्थेचे पारदर्शी नसणे हा मुद्दासुद्धा यात महत्त्वाचा. राज्यकर्ते असो वा प्रशासकीय यंत्रणा. आमचा कारभार पारदर्शी आहे असे सारेच सांगत असतात. प्रत्यक्षात अनेक गोष्टी दडवून ठेवण्याकडेच या साऱ्यांचा कल असतो. त्यामुळे कोण कुठे काम करते, नेमकी प्रशासकीय रचना कशी आहे याची माहितीच सामान्यांना नसते. ती सार्वजनिक व्हावी यासाठी झटणाऱ्या माहिती अधिकार कार्यकर्त्यांची गळचेपी केली जाते. नेमकी हीच बाब या ठगांच्या पथ्यावर पडणारी असते. अलीकडे छत्तीसगडमध्ये स्टेट बँकेची एक बनावट शाखा सुरू असल्याचे उघड झाले. अगदी नीट फलक लावून, कर्मचारी नेमून या शाखेतून आर्थिक व्यवहार होत राहिलेत. त्याकडे बघणाऱ्या कुणालाही साधा संशय आला नाही, हे अतर्क्यच म्हणायचे. देशभरात या बँकेच्या सर्वाधिक शाखा आहेत. जिथे हा प्रकार घडला त्याच्या परिसरात असलेल्या खऱ्या शाखेतील कुणा एका कर्मचाऱ्याला संशय आल्यामुळे हा प्रकार उघडकीस आला. तोपर्यंत बँकेची शाखा उभी राहिली होती, मुलाखती घेऊन रीतसर नेमणुकाही झाल्या होत्या. काही दिवसांपूर्वी साताऱ्यात काश्मीरा पवार नावाच्या तरुणीने पंतप्रधान कार्यालयातील सल्लागार आहे असे भासवून अनेकांची १४ कोटींची फसवणूक केली. महिला बचत गटांना कर्ज, विश्वकर्मा योजनेतून अर्थसाहाय्य मिळवून देतो म्हणून गरजूंना गंडा घातला. महिला व नवउद्योजकांचे ही तरुणी मोठमोठे मेळावे घ्यायची. त्याला शेकडो इच्छुकांनी हजेरी लावली. इतक्या उघडपणे सुरू असलेला गैरव्यवहार एकाच्याही लक्षात आला नाही यावर विश्वास तरी कसा ठेवायचा? हे अर्थसाहाय्य देणाऱ्या सरकारच्या अधिकृत यंत्रणा ठिकठिकाणी आहेत. अगदी तालुका स्तरावरसुद्धा. त्यातल्या कुणाच्याही नजरेला हे मेळावे दिसले नसतील का? अनेकदा अशी फसवणूक यंत्रणेतील लाचखोरांच्या आशीवार्दाने होते. तसे काही प्रकरणांत घडले असेल का? या अशा भामटेगिरीला ऊत येतो तो कायद्याचा धाक नसल्यामुळे. काय होईल? जास्तीत जास्त अटक होईल. तुरुंगात काही काळ राहावे लागेल.

# सुमारे ४ लाख १० हजार रक्कम तक्रारदारास पोलिसांनी बनावट Invesmest App मधील फसवणूक मधील काही हिस्सा पोलिसांनी मोठ्या शिताफीने केला परत




**काशिमिरा-** बनावट Invesment App मध्ये गुंतवणुक करण्यास सांगुन फसवणुक केलेल्या रक्कमेपैकी ४,१०,२३५/- रु तक्रारदार यांना परत करण्यात सायबर पोलीस ठाण्यास यश. सविस्तर माहिती अशी की , मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील कार्यक्षेत्रातील काशिमिरा पोलीस ठाणेच्या हद्दीत राहणारे तक्रारदार श्रीमती. खोसे यांनी ऑनलाईन शेअर ट्रेंडिंग करुन अधिक रक्कम मिळत असल्याने INEFEX या Invesment ॲप वर रक्कमेची गुंतवणुक केली.

परंतु तक्रारदार यांना कोणताही परतावा मिळाला नाही. त्यावर तक्रारदार यांना आर्थिक फसवणुक झाल्याने सायबर पोलीस ठाणे येथे तक्रारी अर्ज सादर केल्याने तात्काळ तक्रारी अजार्ची नोंद घेतली तसेच ऑनलाईन NCCRP Portal वर तक्रार नोंदविण्यात आली.

तक्रारदार यांची ऑनलाईन NCCRP Portal वर तक्रार नोंदविल्याने फसवणुकीची वर्ग झालेली रक्कम संशयीत बँक खात्यात थांबविण्यात आली. तक्रारदार याची बँक खात्यांमध्ये थांबविण्यात आलेली रक्कम परत मिळविण्याकरीता मा. न्यायालयमध्ये अर्ज सादर करण्याबाबत तक्रारदार यांना सुचना देण्यात आल्या. तक्रारदार यांनी त्यांची फसवणुची रक्कम परत मिळविण्याकरीता मा. न्यायालयात याचिका सादर केलेली, त्याबाबत सायबर पोलीस ठाणे यांनी मा. न्यायालयामध्ये सविस्तर अहवाल सादर केला व मा. न्यायालयाचे आदेश प्राप्त केले.

अश्याप्रकारे सायबर पोलीस ठाणे यांनी बँकेसोबत तसेच मा. न्यायालय यांचेकडे पाठपुरवा करुन तक्रारदार यांची फसवणुक झालेली रुपये ४, १०, २३५/- रक्कम त्यांचे मुळ खात्यात परत मिळविण्यात आलेली आहे.

**अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी...**

* कोणत्याही ॲपची पडताळणी केल्याशिवाय डाऊनलोड अथवा Investment ॲपमध्ये गुंतवणुक करु नये.
* Share Market, Forex Trading, Crypto Investment, Mutual Funds गुंतवणुक करण्याअगोदर आपल्या वितीय सल्लागारासोबत चर्चा करुनच गुंतवणुक करा.
* facebook, Watsapp, Instagram अथवा Telegram Channel, वर जास्त परतावा देणाऱ्या Promotional Adds वर विश्वास ठेवु नका. याद्वारे आपली आर्थिक फसवणुक होण्याची शक्यता आहे.
* अश्या प्रकारच्या फसवणुकीमध्ये Telegram Channel, WatsÔpp Group वर ॲड करुन तेथे इतरांना कसा फायदा होत आहे याचे Sceenshot, Massages दाखवुन पैसे गुंतवणुक करण्यास प्रवृत केले जाते. गुंतवणुकदारांचा विश्वास संपादन करण्यासाठी सेबीची बनावट प्रमाणपत्रे दाखवुन फसवणुक करण्यात येते. एकदा गुंतवणुकदारांचा विश्वास जिंकला की, हे लोक गुंतवणुकदारांनाड्ड जास्त परतावा देण्याचे आमिष दाखविणा-या कोणत्याही ट्रेडिंग ॲपवर विश्वास ठेवु नये. तसचे ट्रेडिंग ॲपची विश्वासार्हता तपासुन गुंतवणुक करु नये.
* ऑनलाईन फसवणुक झाल्यास तात्काळ बँकेला संपर्क करावा.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे फसवणूक करणे कायदयाने गुन्हा आहे. असा प्रकार आपल्यासोबत घडला असल्यास नजीकच्या पोलीस ठाणेस, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.

सदरची कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), मि. भा.व. वि. पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली प्रभारी अधिकारी सायबर पोलीस ठाणे पोलीस निरीक्षक सुजितकुमार गुंजकर यांचेसह सपोनि / स्वप्नील वाव्हळ, पोउपनिरी/प्रसाद शेनोळकर, मपोअं/ १६१०६ सुवर्णा माळी, मपोहवा / माधुरी धिंडे, पोअं/ विलास खाटीक, पोअं/राहुल बन सायबर पोलीस ठाणे यांनी पार पाडली आहे.

**सायबर फसवणुक हेल्पलाईन क्रमांक :- १९३०**

सायबर फसवणुक हेल्पलाईन **वेबसाईट :-** www.cybercrime.gov.in

# वसई-विरार शहर महानगरपालिका

**प्रभाग समिती डी आचोळे, नालासोपारा (पु)**

**दुरध्वनी क्रं. ७२१९३७०००६ / ७२१९३७०००९**

**जावक क्र. वविशम /कवि/२०३६/२०२४-२५**
**दिनांक - २५/१०/२०२४**

## जाहिर नोटीस

महाराष्ट्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६९ अन्वये जाहिर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती डी कार्यालय आचोळे नालासोपारा येथे प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरणपरत्वे नोटीसीनुसार सदर हस्तांतरण संर्दभाने कोणत्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती डी कार्यालय आचोळे नालासोपारा येथे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी अन्यथा करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन महानगरपालिका दप्तरी याबाबतची नोंद घेतली जाईल.

| अ. क्र. | विभाग | मालमत्ता क्र. | रिसीट नं. | ज्याच्या नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्या किंवा करदात्याचे नाव | खरिददाराचे किंवा अभिहस्तांकन करदात्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १ | आचोळे-०७ | २६/४३ | ३५८३ | सलीम अहमदअली सय्यद | भरत कुंजबिहारी निषाद व प्रेमशीला भरत निषाद व ब्रिजेश भरत निषाद |
| २ | माणिकपूर-२/२ | AC२०/३६११४ | ३५८६ | शर्मिला संजय चौहाण व संजय त्रिभुवन चौहाण | पुष्पा शिवसागर यादव व शिवसागर रामसुभग यादव |
| ३ | आचोळे-९/१ | ५१३/९८ | ३५८८ | सुविधा बिल्डर्स व डेव्हलपर्स | शिवसागर रामसुभग यादव |
| ४ | आचोळे-९/१ | ५१३/५४ | ३५९० | रामसुभग यादव | शिवसागर रामसुभग यादव |
| ५ | आचोळे-९/१ | ६२१/१२१ | ३५९२ | हेमल दिनेश पटेल | पूनम मनोज उपाध्याय |
| ६ | आचोळे-९/२ | ६६३/२१७ | ३५९५ | अभिमन्यु रमेश साधु व नेहा अभिमन्यु साधु | विपुलकुमार अरविंदभाई पंचाल व सेजल विपुलकुमार पंचाल |
| ७ | आचोळे-०४ | १६३/१२ | ३६०२ | राजेंद्र सुरेश शेटये | पुनम विनोद सोनकर व विनोद गामा सोनकर |
| ८ | आचोळे-०६ | २५४/२ | ३६०४ | सुरेंद्र मनराम यादव | अजय करणविर पिव्हाल |
| ९ | आचोळे-०५ | १५५/५ | ३६०६ | नारायण गंगु यादव | जितेंद्र कुमार रमाशंकर दुबे |
| १० | आचोळे-९/२ | ६८३/३१ | ३६०८ | उषाबेन शाह व जयेश शाहा | जयप्रकाश कुबेरराम गुप्ता |
| ११ | माणिकपूर-२/२ | AC२०/४६६६१ | ३६१२ | मेसर्स वनमाळी एन्ड कंपनी | प्रभा नरेंद्र सुदन |
| १२ | माणिकपूर-२/२ | AC२०/३७६५९ | ३६१४ | कल्पना एम धुमाले | अर्चना चौबे व बिपीन चौबे |
| १३ | आचोळे-१० | ४६२/२४ | ३६१६ | अमीष खुशाल छाडवा व मीत्तल अमीष छाडवा | भोप सिंह |
| १४ | माणिकपूर-२/३ | AC२१/४५३६१ | ३६१८ | सज्वनी एम.एस | माडीवलाप्पा बसाप्पा गुंडाली व बसम्मा माडीवलाप्पा गुंडाली |
| १५ | आचोळे-९/२ | ८०५/५६ | ३६२१ | कंल्पना बिल्डकॉन | अंकित सखुजा व पारुल सखुजा |
| १६ | आचोळे-०८ | ७०/३८ | ३६२३ | विजय एम. मस्त्रुकर | राहुल जगदिश पीप्रोडिया व वर्षा राहुल पीप्रोडिया |
| १७ | आचोळे-०९ | ६५३/१६ | ३६२५ | मधुकांता जे शाह | सचिन किसन शिंदे |
| १८ | आचोळे-०९ | ५९३/३० | ३६२७ | जयेश प्रविणचंद्र सोममाने | अरुणा धर्मा पातळे व धर्मा रामनाथ पातळे |
| १९ | आचोळे-०९ | ६५३/१३ | ३६२९ | सचिन किसन शिंदे | संदेश हरिश्चंद्र नवाळे |
| २० | आचोळे-१० | ४२२/२१ | ३६३२ | अजिंक्य बिल्डर्स | नबिगूल सेबजान शेख व सलिमाबी सिब्जान शेख |

**सही /-**
**प्र. सहा. आयुक्त**
**प्रभाग समिती ''डी'', आचोळे**
**वसई विरार शहर महानगरपालिका**

पोलीस बातमी पत्र

संमिश्र

4

मुंबई, मंगळवार, २९ ऑक्टोबर ते ०४ नोव्हेंबर २०२४


# सरकारी जाहिरातींसाठी सार्वजनिक निधीची उधळपट्टी, दुरुपयोग रोखण्यासाठी समिती स्थापन करा, उच्च न्यायालयाचे राज्य सरकारला आदेश

**मुंबई :** वृत्तपत्रात अथवा इलेक्ट्रॉनिक माध्यमांत प्रसिद्ध होणाऱ्या सरकारी जाहिरातींसाठी सार्वजनिक निधीचा गैरवापर केला जात असल्याच्या जनहित याचिकेची उच्च न्यायालयाने दखल घेतली. तसेच, हा गैरवापर टाळण्यासाठी तीन सदस्यीय समिती स्थापन करण्याचे आदेश राज्य सरकारला दिले.

समितीची पुनर्रचना करून ती पुन्हा सक्रिय करण्याचेही आदेश न्यायमूर्ती महेश सोनक आणि न्यायमूर्ती जितेंद्र जैन यांच्या खंडपीठाने राज्याच्या मुख्य सचिवांना दिले. यापूर्वी, २०१५ मध्ये त्रिसदस्यीय समितीच्या स्थापनेचे आदेश देण्यात आले होते. त्याचा एप्रिल २०१६ मध्येही पुनरुच्चार करण्यात आला होता. त्यामुळे, राज्य सरकारने लवकरात लवकर या त्रिसदस्यीय समितीची स्थापना करावी, असे खंडपीठाने आदेशात प्रामुख्याने नमूद केले आहे.

वृत्तपत्रात अथवा इलेक्ट्रॉनिक माध्यमांत प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींच्या मार्गदर्शक तत्त्वांचे उल्लंघन होत असल्याचा दावा करणारी याचिका एडिटर्स फोरमने दाखल केली होती. त्याचप्रमाणे, माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालय (डीजीआयपीआर), इतर सरकारी संस्था आणि स्थानिक प्राधिकरणांमार्फत होणाऱ्या अनियमिततेबाबत चौकशी करण्यासाठी आयोग स्थापन करण्याची मागणीही केली होती. त्यावरील सुनावणीच्या वेळी न्यायालयाने उपरोक्त आदेश दिले.

सत्ताधारी पक्ष आपला जाहीरनामा सरकारी प्राधिकरणांमार्फत वृत्तपत्रात अथवा इलेक्ट्रॉनिक माध्यमांमध्ये जाहिराती प्रसिद्ध करून करत असतात. तसेच, त्यासाठी सार्वजनिक निधीचा गैरवापर करत असल्याकडे सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वीही लक्ष वेधले होते. त्यामुळे, सरकारकडून या गैरप्रकाराद्वारे भारतीय संविधानाच्या समानतेचा अधिकार आणि वैयक्तिक स्वातंत्र्यांचे उल्लंघन केले जात असल्याचे न्यायालयाने नमूद केले. त्यानंतर, राज्य सरकारने या समस्येवर लक्ष ठेवण्यासाठी एक समिती स्थापन केली होती. मात्र, करोनामुळे ही समिती कार्यान्वित झाली नाही, असे ताशेरेही न्यायालयाने आदेशात ओढले.



# आर्थिक वादातून 77 वर्षांच्या वयोवृद्धेची हत्या; हत्येनंतर मुलाकडून आत्महत्येचा प्रयत्न

**मुंबई :** आर्थिक वादातून झालेल्या भांडणानंतर एका 77 वर्षांच्या वृद्ध महिलेची तिच्याच मुलाने हत्या केली आणि त्यानंतर गेल्यावर तीक्ष्ण हत्याराने वार करून घेत आत्महत्येचा प्रयत्न केल्याचा प्रकार वरळी परिसरात घडला. ललिता तिरुगनना संबनधहम असे या हत्या झालेल्या महिलेचे नाव असून जखमी झालेल्या बालशनमुघम कुप्पूस्वामी या मुलावर उपचार सुरू आहेत. वरळी पोलिसांनी त्याच्याविरुद्ध स्वतःच्या आईची हत्या करून नंतर आत्महत्येचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. ललिता या वरळीतील गांधीनगर शिवसंकल्प सोसायटी येथे राहत होत्या तर त्यांचा विवाहीत मुलगा बालशनमुघम हा पेडर रोड येथील दरभंगा हाऊस अपार्टमेंटमध्ये राहतो. त्यांचा मुलगा काहीच कामधंदा करत नसून पाच ते सहा महिन्यांपासून तो घरीच होता. त्याची पत्नी केंद्रीय सरकारी कर्मचारी असून तिला पेडर रोडचा फ्लॅट राहण्यासाठी मिळाला होता. बालशनमुघम याच्यावर काही कर्ज होते. या कर्जाच्या परतफेडीसाठी त्याला पैशांची गरज होती. यासाठीच शुक्रवारी रात्री तो त्याच्या आईच्या वरळीतील घरी आला होता. पैशांवरुन त्यांच्यात प्रचंड शाब्दिक बाचाबाची झाली. त्यातून रागाच्या भरात त्याने आईची गळा आवळून हत्या केली. हत्येनंतर तो प्रचंड घाबरला आणि त्याने घरातील चाकूने स्वतःच्या गळ्यावर वार केले. हा प्रकार स्थानिकांच्या लक्षात येताच त्यांनी ही माहिती तातडीने कंट्रोल रुमला दिली. कंट्रोल रुममधून ही माहिती मिळताच वरळी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली.

परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेत पोलिसांनी या दोघांनाही तातडीने नायर रुग्णालयात दाखल केले. तिथे ललिताला डॉक्टरांनी मृत घोषित केले तर बालशनमुघम याला नंतर दुसऱ्या रुग्णालयात हलविण्यात आले. तिथेच त्याच्यावर उपचार सुरु असून त्याची प्रकृती स्थिर आहे. याप्रकरणी वरळी पोलिसांनी बालशनमुघम याच्याविरुद्ध हत्येसह आत्महत्येचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. या गुन्ह्याचा तपास सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले. रुग्णायातून डिस्चार्ज मिळताच आरोपी मुलाला अटक केली जाईल असे पोलिसांनी सांगितले.

# हरवलेली महिला आणि दोन्ही मुलांचा वाराणशी उत्तरप्रदेश मध्ये कसून शोध घेण्यास पोलिस ठरले यशस्वी

**काशिमिरा-** मिसींग असलेली महीला व तिच्या दोन्ही मुलास वाराणसी, उत्तरप्रदेश येथे शोधण्यास मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेस यश.मिळालेल्या माहिती नुसार मिसींग महिला १) सुजाता मिथलेश चौधरी वय - ४० वर्षे व त्यांची दोन मुले २) अभिजीत मिथलेश चौधरी वय-२२ वर्षे ३) आदीत्य मिथलेश चौधरी वय - १९ वर्षे तिन्ही रा. रुम क्र. ०२, हनुमान मंदीरचे पाठीमागे, पेणकरपाडा, मिरारोड पुर्व असे तिघेही दिनांक ०५.०८.२०२४ रोजी ०८.०० वाजता राहते घरातुन कोणासही काहीही न सांगता निघुन गेल्याने मिसींग व्यक्तींचे पती व वडील मिथलेश जोगी चौधरी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन काशिमिरा पोलीस ठाणे मनुष्य मिसींग दिनांक ०५.०८.२०२४ रोजी दाखल आहे.

मिसींग महीला व तिची दोन्ही मुले यांचा गेले अडीच महीने पोलीसांना कोणताही ठावठिकाणा मिळुन येत नव्हता. तक्रारदार यांना त्याच्या पत्नी व मुलांचा अडीच महीन्यात काहीही संपर्क न झाल्याने त्यांचे कोणीतरी काहीतरी बरेवाईट केले असावे अशी भिती वाटू लागल्याने तक्रारदार यांनी गुन्हे शाखेशी संपर्क साधला. विषयाचे गांभीर्य लक्षात घेवून वरिष्ठांनी सुचना दिल्याप्रमाणे मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे प्रभारी राहुल राख यांनी पोउपनिरी. हितेंद्र विचारे, पोहवा. हनुमंत सुर्यवंशी असे तपास पथक तयार केले.नमुद पोलीस पथकाने सदर मन्युष्य मिसींगची काशिमीरा पोलीस ठाणेतुन माहीती घेऊन त्यानुसार तांत्रिक व गोपनिय तपास करून मेहनत घेवुन तपासात सातत्य ठेवून वरील तिन्ही मिसींग व्यक्ती या वाराणसी, उत्तरप्रदेश येथे असल्याची माहीती गुप्त बातमीदाराकडुन तसेच तांत्रीक विष्लेषनवरुन मिळाली असता सदर ठिकाणी वरीष्ठांचे परवानगीने पोहवा / हनुमंत सुरेश सुर्यवंशी यांना रवाना करण्यात आलेले होते. पोहवा / हनुमंत सुर्यवंशी यांनी वरील तिन्ही मिसींग इसमाचा रामनगर पोलीस ठाणे, जिल्हा वाराणसी, उत्तरप्रदेश येथील पोलीसांचे मदतीने शोध घेतला असता वरील तिन्ही मिसींग इसम हे भिटी सुलतानपुर, रामनगर, वाराणसी, उत्तरप्रदेश येथे मिळुन आले आहेत.

सदरची कारवाई ही मा. पोलीस उप आयुक्त (गुन्हे) श्री. अविनाश अंबुरे व सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. मदन बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे प्रभारी पोलीस निरीक्षक राहुल राख, पोनि धनंजय पोरे, सपोनि दत्तात्रय सरक, नितीन बेन्द्रे, पोउपनि हितेंन्द्र विचारे, सहापोउपनि श्रीमंत जेधे, मनोहर तावरे, आसीफ मुल्ला, पोहवा / हनुमंत सुर्यवंशी, संग्राम गायकवाड, शिवाजी पाटील, गोविंद केद्रे, राजाराम काळे, संतोष मदने, सतिष जगताप, राजविर संधु, प्रविणराज पवार, महेश वेल्हे, अनिल नागरे, पोशि.साकेत माघाडे अखिल सुतार, नितीन राठोड, अंगद मुळे, मसुब सचीन चौधरी, सफौ.संतोष चव्हाण सर्व नेमणुक मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखा यांनी यशस्वी कामगिरी केलेली आहे.

# वर्क फ्रॉम हॉमच्या नावाखाली अनेक प्रकारच्या ऑनलाईन व्यवसायातील फसवणूक झालेली ४ लाख ७६ हजार रक्कम पोलिसांनी तक्रारदारास केली परत.

**मिरारोड-** Work From Home "नावा खाली ऑनलाइन यु टुब व्हिडीओ लाईक स्टास्क, ऑनलाईन हॉटेल/मुव्ही रेटींगमध्ये गुतंवणुक करण्यास सांगुन केलेल्या फसवणुकीतील संपुर्ण रक्कम ४,७६, ०००/-रुपये तक्रारदार यांना परत करण्यात काशिगांव पोलीस ठाण्यास यश. अधिकमाहितीनुसार मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील काशिगांव पोलीस स्टेशन परीसरात राहणाऱ्या श्रीमती निलम संकपाळ, वय ३६ वर्ष, रा. मिरारोड पुर्व "Work From Home" नावाखाली ऑनलाइन यु-टुब व्हिडीओ लाईक स्टास्क, ऑनलाईन हॉटेल / मुव्ही रेटींग यांना लाईक अथवा गुंतवणुक केल्यास अधिकनफा मिळविण्याचे आमिष दाखवुन फियार्दी यांची ४,७६, ०००/- रुपयांची फसवणुक झाली होती. सदर फसवणुकीच्या अनुषंगाने काशिमिरा पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आलेला होता. नमूद तक्रारीबाबत तात्काळ गुन्हा दाखल करुन घेवून फियार्दी यांचे झाले व्यवहाराबाबत काशिमिरा पोलीस ठाणे यांनी माहिती प्राप्त केली . प्राप्त माहितीचे अवलोकन केले असता, फियार्दी यांची रक्कम वेगवेगळ्या बॅकखात्यात वळती झाल्याचे दिसुन आले. त्याअनुषंगाने तक्रारदार यांची रक्कम गोठविण्याबाबत संबंधीत बंकेसोबत पत्रव्यवहार करुन संशयीत खात्यामध्ये रक्कम गोठविण्यात आली. त्यानंतर मा. न्यायालयाकडुन फियादी यांची रक्कम परत मिळविण्याकरीता काशिगांव पोलीस ठाणेचे अधिकारी / अंमलदार यांनी वेळोवेळी पाठपुरावा केल्याने श्रीमती निलम संकपाळ, वय ३६ वर्ष यांची फसवणुक झालेली संपुर्ण रक्कम ४,७६, ०००/- रुपये त्यांचे खात्यावर परत मिळविण्यात आली आहे.




**अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी ध्यावयाची काळजी...**

* Telegram Channel, facebook, Instagram अथवा Watsapp वर जास्त परतावा देणाऱ्या Promotional Adds वर विश्वास ठेवू नका. याद्वारे आपली आर्थिक फसवणुक होण्याची शक्यता आहे.

* अश्या प्रकारच्या फसवणुकीमध्ये Channel, Watsapp Group वर एंड करुन तेथे इतरांना कसा फायदा होत आहे याचे Sceenshot, Massages दाखवुन पैसे गुंतवणुक करण्यास प्रवृत केले जाते. गुंतवणुकदारांचा विश्वास संपादन करण्यासाठी काही लोकांचे बॅक स्टेटमेंट मध्ये त्यांना फायदा झालेली रक्कम दाखवुन फसवणुक करण्यात येते. एकदा गुंतवणुकदारांचा विश्वास जिंकला की, हे लोक गुंतवणुकदारांना जास्त व खात्रिशिर परताव्याची हमी देतात. अशा गुंतवणुकीमध्ये आर्थिक फसवणुक होण्याचा धोका मोठ्या प्रमाणात असतो.

* Work From Home Ret Online You Tube Video Like Tasks, Hotel/Movie Rating या सारखा गुंतवणुक करण्याऱ्या बनावट जाहिरातींना बळी पडू नये.

* कोणतेही अनाधिकत ऐंप्लिकेशन डाऊनलोड करु नये अथवा अनोळखी लिंकवर क्लिक करु नये.

* ऑनलाईन फसवणुक झाल्यास तात्काळ बॅकेला संपर्क करावा.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे फसवणूक करणे कायद्याने गुन्हा आहे. असा प्रकार आपल्यासोबत घडला असल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस, सायबर गुन्हे कक्षास संप्के साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईन वर संपर्क साधुन तक्रार द्यावी .

सदरची कामगिरी श्री. प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त, परि - ०१, श्री. विजयकुमार मराठे, सहा.पोलीस आयुक्त, मिरारोड विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली श्री राहुलकुमार पाटील, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. राहुल सोनवणे, पोलीस निरीक्षक, पोहवा /सचिन पाटील यांनी पार पाडली आहे.

सायबार फसवणुक हेल्पलाईनक्रमांक- १९३०

सायबर फसवणुक हेल्पलाइन वेबसाईट - www.cybercrime.gov.in

# शेअर मार्केट गुंतवणुकीतील फसवणूक झालेल्या रक्मे पैकी सुमारे २० लाख २५ हजार रक्कम पोलिसांनी तक्रारदारास केली परत

**मिरारोड -** मोबाईलवर प्राप्त अनोळखी लिंकद्वारे Fake Share Trading मध्ये गुंतवणुक करण्यास सांगुन फसवणुक केलेल्या रक्कमेपैकी २०,२५,०००/- रु तक्रारदार यांना परत करण्यात सायबर पोलीस ठाण्यास यश. सविस्तर माहिती अशी कि ,मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील कार्यक्षेत्रातील नयानगर पोलीस ठाणेचे हद्दीत राहणारे तक्रारदार श्री. दत्तानी यांचे मोबाईलवर Fake Share Tradingमध्ये गुंतवणूक करण्यासाठी अनोळखी लिंक प्राप्त झाली. सदर लिंकमध्ये ऑनलाईन शेअर ट्रेडिंग करुन अधिक लाभ मिळत असल्याचे आमिष दाखवुन गुंतवणुक करण्याबाबत सांगितले होते. तक्रारदार यांनी प्राप्त लिंक ओपन करुन रक्कमेची गुंतवणुक केली. परंतु तक्रारदार यांना कोणताही परतावा मिळाला नाही. त्यावर तक्रारदार यांना आर्थिक फसवणुक झाल्याने सायबर पोलीस ठाणे येथे तक्रारी अर्ज सादर केल्याने तात्काळ तक्रारी अजार्ची नोंद घेतली तसेच ऑनलाईन NCCRP Portal वर तक्रार नोंदविण्यात आली. सायबर पोलीस यांनी तक्रारदार यांची ऑनलाईन NCCRP Portal वर तक्रार नोंदविल्याने फसवणुकीची वर्ग झालेली रक्कम संशयीत बँक खात्यात थांबविण्यात आली. तक्रारदार याची बँक खात्यांमध्ये थांबविण्यात आलेली रक्कम परत मिळविण्याकरीता मा. न्यायालयमध्ये अर्ज सादर करण्याबाबत तक्रारदार यांना सुचना देण्यात आल्या. तक्रारदार यांनी त्यांची फसवणुची रक्कम परत मिळविण्याकरीता मा. न्यायालयात याचिका सादर केलेली, त्याबाबत सायबर पोलीस ठाणे यांनी मा. न्यायालयामध्ये सविस्तर अहवाल सादर केला व मा. न्यायालयाचे आदेश प्राप्त केले.अश्याप्रकारे सायबर पोलीस ठाणे यांनी बँकेसोबत तसेच मा. न्यायालय यांचेकडे पाठपुरावा करुन तक्रारदार यांची फसवणुक झालेली रुपए २०,२५,०००/- रक्कम त्यांचे मुळ खात्यात परत मिळविण्यात आलेली आहे.

**अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी ध्यावयाची काळजी...**

* मोबाईल प्राप्त कोणत्याही अनोळखी लिंकवर क्लिक करुन नये.

* कोणत्याही ॲपची पडताळणी केल्याशिवाय डाऊनलोड अथवा Investment ॲपमध्ये गुंतवणुक करु नये.

* Share Market, Forex Trading, Crypto Investment, Mutual Funds fl गुंतवणुक करण्याअगोदर आपल्या वितीय सल्लागारासोबत चर्चा करुनच गुंतवणुक करा.

* facebook, Watsapp, Instagram अथवा Telegram Channel, वर जास्त परतावा देणाऱ्या Promotional Adds वर विश्वास ठेवु नका. याद्वारे आपली आर्थिक फसवणुक होण्याची शक्यता आहे.

* अश्या प्रकारच्या फसवणुकीमध्ये Telegram Channel, Watsapp Group वर ॲड करुन तेथे इतरांना कसा फायदा होत आहे याचे Sceenshot, Massages दाखवुन पैसे गुंतवणुक करण्यास प्रवृत केले जाते. गुंतवणुकदारांचा विश्वास संपादन करण्यासाठी सेबीची बनावट प्रमाणपत्रे दाखवुन फसवणुक करण्यात येते. एकदा गुंतवणुकदारांचा विश्वास जिंकला की, हे लोक गुंतवणुकदारांना जास्त व इृ जास्त परतावा देण्याचे आमिष दाखविणाऱ्या कोणत्याही ट्रेडिंग ॲपवर विश्वास ठेवु नये. तसचे ट्रेडिंग ॲपची विश्वासार्हता तपासुन गुंतवणुक करु नये.

* ऑनलाईन फसवणुक झाल्यास तात्काळ बँकेला संपर्क करावा.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे फसवणूक करणे कायदयाने गुन्हा आहे. असा प्रकार आपल्यासोबत घडला असल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस, सायबर कक्षा संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.

गुन्हे सदरची कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), मि. भा.व. वि. पोलीस आयुक्तालय यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभारी अधिकारी सायबर पोलीस ठाणे पोलीस निरीक्षक सुजितकुमार गुंजकर यांचेसह सपोनि / स्वप्नील वाव्हळ, पोउपनिरी/प्रसाद शेनोळकर,मपोअं/ सुवर्णा माळी, मपोहवा / माधुरी धिंडे, पोअं/ विलास खाटीक, पोअं/ राहुल बन सायबर पोलीस ठाणे यांनी पार पाडली आहे.

सायबर फसवणुक हेल्पलाईन क्रमांक :- १९३०

सायबर फसवणुक हेल्पलाईन वेबसाईट - www.cybercrime.gov.in


## मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय

छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता.जि.ठाणे - ४०१ १०१

जा.क्र.मनपा / १४३/२०२४-२५ दिनांक २३/१०/२०२४

### // जाहीर आवाहन //

(माझी वसुंधरा अभियान ५.० व स्वच्छ सर्वेक्षण २०२४ अभियानाअंतर्गत जाहिर आवाहन)

- महाराष्ट्र शासनाचे माझी वसुंधरा अभियान ५.० व स्वच्छ सर्वेक्षण २०२४ अभियानातंर्गत फटाके मुक्त, प्लास्टीक मुक्त, कचरामुक्त, प्रदुषणमुक्त व पर्यावरण पुरक दिवाळी उत्सव साजरा करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.
- सदर अभियानातंर्गत नागरीकांनी फटाक्यांचा वापर टाळावा, प्लास्टिकचा वापर टाळून कापडी किंवा कागदी पिशवीचा वापर करावा तसेच टाकाऊ वस्तुचा व पुनःवापर करण्यायोग्य वस्तुचा वापर जास्तीत जास्त करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.
- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सर्व फटाके विक्रीदार / व्यवसायिक व फटाके विकत घेणारे ग्राहक यांना आवाहन करण्यात येते की, भारत सरकार अधिसुचना क्रमांक G.S.R. 682(E). D8.5.10.1999 अन्वये १२५ dB (AI) पेक्षा जास्त आवाज निर्माण करणा-या फटाक्यांची निर्मिती, विक्री किंवा वापर करण्यास मनाई केली आहे.
- मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निदेर्शानुसार फटाक्यांमध्ये बेरीयम सॉल्ट, लिथीयम, अर्सेनिक, लिड, मक्युर्री या सारखे घटक असणारे फटाके वापरण्यास बंदी आहे. तरी फटाके विक्रेत्यांनी बंदी असलेले फटाके विक्री करु नयेत.
- फटाक्यांची विक्री महानगरपालिकेने निश्चित केलेल्या ठिकाणी परवानगी घेऊनच करण्यात यावी.
- मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल PII. No. ३/ २०२३ मध्ये संध्या ७.०० ते रात्री १०.०० या वेळेत फाटके फोडण्याचे निर्देश दिलेले आहेत. त्याचे पालन करण्यात यावे.
- नागरीकांनी आपल्या सोसायटीमधील फाटक्याचा कचरा वेगळा गोळा करुन सफाई कर्मचारी यांच्याकडे देण्यात यावा. जेणेकरुन त्याची योग्य प्रकारे विल्हेवाट लावण्यास मदत होईल.

येणारी दिवाळी हरित व पर्यावरणपुरक दिवाळी म्हणुन साजरी करूया. तसेच ही दिवाळी आनंदी व सुरक्षित राहो अशा सर्वांना हार्दिक शुभेच्छा !!

सही/-
(कल्पिता पिंपळे)
उप-आयुक्त (मुख्या)
मिरा भाईंदर महानगरपालिका

जा. क्र. मनपा /मावज / ४६१/ २०२४-२५
दि. २५/१०/२०२४



हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक झ्र श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय झ्र गाळा नं. ४, एन.के.इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), येथे छापून २, राजाराम सी.एच.एस. लिमिटेड, बंदरवाडी, नवघर रोड, भाईंदर (पुर्व), जिल्हा ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिध्द केले. संपादक झ्र श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमान पत्रात प्रसिध्द होणा-या बातम्या/लेख/जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यावर राहील.) भ्रमणध्वनी ८४२४९८९८९८ . Email ID : policebatmipatra@gmail.com

Printed, Published and owned by Mr.Dr. Deepak MoreshwarNaik Printed at SOMANI PRINTING PRESS, OFFICE – UNIT NO. 4, N.K.INDUSTRIAL ESTATE, NEAR PRAVASI INDUSTRIAL ESTATE, GATE NO. 2, GOREGAON (E), MUMBAI 400063, MAHARASHTRA, Published At – 2, RajaramChs. Ltd., Bunderwadi, Navghar Road, Bhayander(E), Dist – Thane, Pincode 401105, Maharashtra. Editor – Mr. Dr. Deepak MoreshwarNaik. Mo.8424989898, Email ID: policebatmipatra@gmail.com